माध्यम जे जपते
बातमी सोबत संस्कृती

आपला सिंधुनगरी
न्यूज चॅनेल

२०२६



# आरती संग्रह

सर्व गणेश भक्तांना
**गणेश चतुर्थीच्या**
हार्दिक शुभेच्छा!


## स्मार्ट हेअर ड्रेसर्स, सोमवार पेठ, मालवण.

(अत्याधुनिक सोयींनी सज्ज!)

Smart
Hair Dressers

**प्रोप्रा : शुभम विवेकानंद लाड**
( संपर्क : ८४११८४६१०६ )

युनिसेक्स सलून | हायड्रा फेशियल | केराटिन स्मूथनिंग | बोटोलिस ट्रीटमेंट | हेअर पॅच | हायलाइट्स | बालायज | हेअर स्पा | अँटी डॅंड्रफ ट्रीटमेंट | केस आणि त्वचेची काळजी

# गणपती बाप्पा मोरया



## चैतन्य

अस्सल! मालवणी

**Malvan | Mumbai | Thane**

CHAITANYA
COAST & BLOOM

उबन्टू
ज्यूस, कॉफी आणि बरंच काही

MOTHER O' MALVAN

# आरती गणपतीची







सुखकर्ता दुःखहर्ता, वार्ता विघ्नाची |
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ||
सर्वांगी सुन्दर उटी शेंदुराची |
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ||
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पुरती.. जय देव जय देव

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा |
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ||
हिरे जडित मुकुट शोभतो बरा |
रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया ||
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पुरती.. जय देव जय देव

लंबोदर पितांबर फणीवर बंधना |
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना||
दास रामाचा वाट पाहे सदना |
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना ||
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पुरती.. जय देव जय देव



## ** आरती श्रीदेवीची **



दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारीं वारीं जन्म मरणांते वारी ।
हारी पडलो आता संकट नीवारी ॥ १ ॥
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ धृ. ॥
त्रिभुवनी भुवनी पाहतां तुज ऐसे नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलवे काहीं ॥
साही विवाद करितां पडले प्रवाही ।
ते तूं भक्तालागी पावसि लवलाही ॥ २ ॥
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशापासूनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥





# आरती श्री शंकराची



लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा।
वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।
तेथुनियां जल निर्मळ वाहे झुळझूळां॥ १॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा।
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा॥ ध्रु०॥
कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा।
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा॥
विभुतीचे उधळण शीतकंठ नीळा।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा॥
जय देव० ॥ २॥
देवीं दैत्यी सागरमंथन पै केले।
त्यामाजीं जें अवचित हळाहळ उठिलें॥
तें त्वां असुरपणें प्राशन केलें।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें॥
जय देव० ॥ ३॥
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी॥
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी।
रघुकुळटिळक रामदासा अंतरीं॥ जय देव
जय देव० ॥ ४॥



# आरती श्री विठ्ठलाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा
पावे जिवलगा ॥धृ०॥
तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी
कासे पीताम्बर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी
गरुड हनुमन्त पुढे उभे राहती ॥२॥
धन्य वेणूनाद अणुक्षेत्रपाळा
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणीया सकळा
ओवाळिती राजा विठोबा सावळा ॥३॥
ओवाळू आरत्या कुरवंड्या येती
चन्द्रभागेमाजी सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥४॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती
चन्द्रभागेमाजी स्नाने जे करिती ।
दर्शन होळामात्रे तया होय मुक्ति
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥५॥





# श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ॥धृ॥
नेती नेती शब्द न ये अनुमाना ॥
सुरवर मुनिजन योगी
समाधी न ये ध्याना ॥ १ ॥
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता ।
आरती ओवाळिता हरली भवचिंता
सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।
अभाग्यासी कैची कळेल ही मात ॥
पराही परतली तेथे कैचा हा हेत ।
जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥



दत्त येऊनिया उभा ठाकला ।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला ।
जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ ३ ॥
दत्त दत्त ऐसें लागले ध्यान ।
हरपले मन झाले उन्मन ॥
मी तू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥



# आरती श्रीकृष्णाची

ओवाळू आरती मदनगोपाळा ।
श्यामसुंदर गळा वैजयंतीमाळा ।।ध्रु।।
चरणकमल ज्याचे अति सुकुमार ।
ध्वजवज्रांकुश ब्रीदाचे तोडर ।। ओवाळू।।1।।
नाभिकमल ज्याचे ब्रह्मयाचे स्थान ।
हृदयी पदक शोभे श्रीवत्सलांछन ।। ओवाळू।।2।।
मुखकमल पाहतां सुखाचिया कोटी ।
वेधले मानस हारपली दृष्टी ।। ओवाळू।।3।।
जडितमुगुट ज्याचा दैदिप्यमान ।
तेणे कोंदले अवघे त्रिभुवन ।। ओवाळू।।4।।
एका जनार्दनी देखियले रूप ।
पाहता जाहले अवघे तद्रूप ।ओवाळू।।5।।



# श्री सत्यनारायण आरती

जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥
पंचारती ओवाळू श्रीपति तुज भक्तिभावा ॥

विधियुक्त पूजुनी करिती पुराण श्रवण ॥
परिमलद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून ॥
घृतयुक्तशर्करामिश्रित गोधूमचूर्ण ॥
प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तूं त्यां नारायण ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥

शतानंदे विप्रें पूर्वी व्रत हें आचरिलें ॥
दरिद्र दवडुनि अंतीं त्यातें मोक्षपदा नेलें ॥
त्यापासुनि हें व्रत या कलियुगीं सकळां श्रुत झालें ॥
भावार्थे पूजितां सर्वां इच्छित लाधलें ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥

साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थियलें ॥
इच्छित पुरतां मदांध होऊनि व्रत न आचरिलें ॥
त्या पापानें संकटिं पडुनी दुःखहि भोगीलें ॥
स्मृति होऊनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥

प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ॥
क्षोभ तुझा होतांचि तयाची नौका बुडाली ॥
अंगध्वजरायासी यापरि दुःखस्थिति आली ॥
मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णी परिसली ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥

पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ॥
पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ॥
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनि ॥
ऐसा भक्तां संकटिं पावसी तूं चक्रपाणी ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा॥

अनन्यभावें पूजुनि हें व्रत जेजन आचरती ॥
इच्छित पुरविसि त्यांतें देउनि संतति संपत्ति ॥
संहरती भवदुरितें सर्वही... बंधने तुटती ॥
राजा रंका समान मानुनि पावसि श्रीपती ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥

ऐसा तव व्रतमहिमा अपार वर्णूं मी कैसा ।
भक्तिपुरःसर आचरती त्यां पावसि जगदीशा ।
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा ॥
मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥






# आरती स्वामी समर्थांची

जयदेव जयदेव श्री स्वामी समर्था
आरती ओवाळू चरणी ठेवूनिया माथा !!
जयदेव जयदेव..!!
छेली खेडेग्रामी तू अवतरलासी,
जगदुध्दारासाठी राया तू फिरसी
भक्त वत्सल खरा तू एक होसी,
म्हणूनी शरण आलो तुझिया चरणांसी !!
जयदेव जयदेव..!!
त्रैगुण परब्रम्ह तुझा अवतार,
याची काय वर्णू लीला पामर
शेषादिक शिणले न लगे त्या पार,
तेथे जडमूढ कैसा करु विस्तार !!
जयदेव जयदेव..!!
देवाधिदेव तू स्वामीराया, निर्जर मूनिजन
ध्याती भावे तव पाया
तुजसी अर्पण केली आपली ही काया,
शरणागता तारी तू स्वामीराया !!
जयदेव जयदेव..!!
अघटित लीला करुनी जडमूढ उध्दरीले,
किर्ती ऐकुनी कानी चरणी मी लोळे.
चरण प्रसाद मोठा मज हे अनुभवले,
तुझ्या सूता न लगे चरणा वेगळे
!! जयदेव जयदेव..!!






# ॥ दशावताराची आरती ॥

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ।
भक्तसंकटी नानास्वरूपीं स्थापिसी स्वधर्म ॥ धृ. ॥

अंबऋषी कारणे गर्भवास सोशीसी ।
वेद नेले चोरुनि ब्रह्मा आणुनिया देसी ।
मत्स्यरुपीं नारायण सप्तहि सागर धुंडीसी ।
हस्त लागतां शंखासुरा तूझा वर देसी ॥ १ ॥

रसा तळाशी जातां पृथ्वी पाठीवर घेसी ।
परोपकारासाठी देवा कांसव झालासी ॥
दाढें धरुनी पृथ्वी नेता वराह रुप होसी ।
प्रल्हादा कारणे नरहरि स्तंभी गुरगुरसी ॥ २ ॥

पांचवे अवतारी बळिच्या द्वाराला जासी ।
भिक्षे स्थळ मागुनी बळिला पाताळी नेसी ॥
सर्व समर्पण केले म्हणूनि प्रसन्न त्या होसी ।
वामनरूप धरूनी बळिच्याद्वारी तिष्ठसी ॥ ३ ॥

सहस्त्रार्जुन मातला जमंदग्नीचा वध केला ।
कष्टी ते रेणुका म्हणुनी सहस्रार्जुन वधिला ॥
नि:क्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ।
सहावा अवतार परशुराम प्रगटला ॥ ४ ॥

मातला रावण सर्वां उपद्रव केला ।
तेहतिस कोटी देव बंदी हरलें सीतेला ॥
पितृवचना साठी रामें वनवास केला ।
मिळोनी वानर सहित राजाराम प्रगटला ॥ ५ ॥

देवकी वसुदेव बंदी मोचन त्वां केलें ।
नंदाघरि जाऊन निजसुख गोकुळा दिधले ॥
गोरसचोरी करिता नवलक्ष गोपाळ मिळविले ।
गोपिकांचे प्रेम पाहूनी श्रीकृष्ण भुलले ॥ ६ ॥

बौद्ध कलंकी कलियुगी होता अधर्म हा अवघा ।
सोडूनी दिधला धर्म म्हणुनी न दिससी देवा ॥
म्लेंच्छमर्दन करिसी म्हणुनी कलंकी केशवा ।
भैरवि जान्हवि द्यावी निजसुखाआनंद सेवा ॥ ७ ॥



# प्रदक्षिणा

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची।
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची।। धृ.।।
पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी।
सर्वही तीर्थे घडली आम्हा आदिकरुनि काशी।। १।।
मृदुंग टाळ ढोल भक्त भावार्थे गाती।
नामसंकीर्तने ब्रह्मानंदे नाचती।। २।।
कोटि ब्रह्महत्या हरिती करितां दंडवत।
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात।। ३।।
गुरुभजनाचा महिमा न कळे आगमानिगमांसि।
अनुभव जे जागति ते गुरुपदिचे अभिलाषी।। ४।।
प्रदक्षिणा करूनि देह भावे वाहिला।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला।। ५।।






# कर्पूरारती

कर्पूरगौरा! करुणावतारा!
संसारसारा भुजगेंद्रहारा !!
सदावसन्तं हृदयारविन्द्रे
भवा. भवानी सहितं नमामि ||१||

कर्पूर दे परम मोद मन सुवासें ।
शोभा वरी रुचिर कांचनपात्रवासें ।
उद्दीप होउनि मनोहर तेज जेंवी ।
तेणें करीन तुज आरति ईश! सेवीं ।।२।।




# प्रार्थना

घालीन लोटांगण, वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रुप तुझें ।
प्रेमें आलिंगन, आनंदे पूजिन ।
भावें ओवाळीन म्हणे नामा ।।१।।
त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुक्ष्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव।।२।।
कायेन वाचा मनसेंद्रीयेव्रा,बुद्धयात्मना वा
प्रकृतिस्वभावात ।
करोमि यध्य्त सकलंपरस्मे,
नारायणायेति समर्पयामि ।।३।।
अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं
वासुदेवं हरिम।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं,
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।४।।
हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।



# आरती संग्रह २०२६

## ।। विघ्नहर्ता श्री गणरायाच्या ।।

आशीर्वादाने आपले सर्व विघ्न दूर होवोत,
सुख, समृद्धी, आरोग्य आणि शांती लाभो.

# गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा!





मान.श्री. डॉ. दशरथ जाधव
(नाना सरकार)
अध्यक्ष, संचालक

## आमच्या तीन विश्वासार्ह संस्था

- Ex. Vice President : Bhartiya Janata Party Yuva Morcha, Sangli.
- President: Mr. Shri Devendra Fadnavis Youth Foundation Maharashtra State
- Director: NanaSarkar Security Services Pvt. Ltd. Mumbai
- Founder Chairman: Nanasarkar Co-op Credit Society Ltd.Gavhan

9890235864

स्था.२०२४
सहकारातून उध्दाराकडे
नानासरकार
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. गव्हाण
ता. तासगांव जि. सांगली

## नानासरकार को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

- ठेवी योजना
- कर्ज सुविधा
- मायक्रो फायनान्स
- सदस्यांचा विश्वास, आमची ताकद

98902 35864

NANA SARKAR

## NANASARKAR SECURITY SERVICES (OPC) PVT. LTD.

## NANASARKAR CONSULTANCY SERVICES.

- सुरक्षा रक्षक सेवा
- इव्हेंट सिक्युरिटी
- हाउसकीपिंग सेवा
- सल्लागार सेवा

98902 35864

मुख्य कार्यालय : श्रीराम समर्थ, लक्ष्मी अपार्टमेंट, प्लॉट नं. 365/366, शॉप नं. 1 नियर मयूर हॉटेल, सेक्टर 5, सानपाडा, नवी मुंबई, 400705.

गव्हाण ता. तासगांव जि. सांगली

nanasarkarsecurities@gmail.com

www.nanasarkarsecurityservices.com

## ।। आपल्या विश्वासाला आमची साथ, सर्वांच्या प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न ! ।।

# श्री वेतोबाची आरती

वेतोबाची आरती करुया
पंचप्राणांनी । अनन्य जावूनी
शरण मागुया आशिष प्रभू
चरणी ।। धृ.।।

भक्तोध्दारण ऐसी इच्छा
भुमिया मनी धरुनी वेतोबाला
घेवून येई आरवली संस्थानी
भुतावळ ही चरणी दडपुनी उभी
भक्तजननी भव्य उंच ही मुर्ती
काळी धरी खड्ङ्ग अग्री ।।१ ।।

भक्त संकटी असता धावून
सत्वर येई क्षणी भक्तांच्या
सौख्यास्तव फिरतो निशिदिनी
हा अवनी रिध्दी सिध्दीच्या
देवा स्मरता भूते थरथरती कृपा
दृष्टीने यांच्या होतो रंक राव
जगती ।।२।।



भक्ता गृहा येवूनी
याचक क्षुधा शांत
व्हावी अनंत वेषे रहातो
कशी पारख व्हावी
स्वांगे घालूनी उडी
चालवी कामे
कोर्टातूनी देई परिक्षा
भक्ता काजी अघटीत
करी करणी ।। ३ ।।

वेतोबाला सद्भावे जे
भजती पूजती मनी
प्रसन्न होवूनी
हिरेमाणिके देई भक्त
जनी गोड नाव तव
मुखी राहू दे तन मन
धन चरणी जन्मोजन्मी
तुझी घडू दे सेवा आस
मनी ।।४ ।।



# साईबाबांची आरती

आरती साईबाबा ।
सौख्यदातार जीवा।
चरणरजातली ।
द्यावा दासा विसावा,
भक्ता विसावा ।। ध्रु ।।
जाळुनियां अनंग ।
स्वस्वरूपी राहेदंग ।
मुमुक्षूजनां दावी ।
निज डोळा श्रीरंग ।। १ ।।
जयामनी जैसा भाव ।
तया तैसा अनुभव ।
दाविसी दयाघना ।
ऐसी तुझीही माव ।। २ ।।
तुमचे नाम ध्याता ।
हरे संस्कृती व्यथा ।
अगाध तव करणी ।
मार्ग दाविसी अनाथा ।। ३ ।।



कलियुगी अवतार ।
सगुण परब्रह्मः साचार ।
अवतीर्ण झालासे ।
स्वामी दत्त दिगंबर ।। ४ ।।
आठा दिवसा गुरुवारी ।
भक्त करिती वारी ।
प्रभुपद पहावया ।
भवभय निवारी ।। ५ ।।
माझा निजद्रव्यठेवा ।
तव चरणरज सेवा ।
मागणे हेचि आता ।
तुम्हा देवाधिदेवा ।। ६ ।।
इच्छित दिन चातका।
निर्मल तोय निजसुख ।
पाजावे माधवा या ।
सांभाळ आपुली भाक ।। ७ ।।



# मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्मानि प्रथमन्यासन । ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः । ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । समे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो दादातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः। ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं वैराज्यं, परमेष्ठ्यं, राज्यं, महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्य ईस्यात् सार्वभौमः सर्वायुष्यः आन्तादापरार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यंन्तया एकराळिति तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूतस्यावसन् गृहे । अविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति । एकदन्ताय विघ्नहे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नोदंतीः प्रचोदयात। ।।श्री मंगलमूर्ती मोरया। श्री मंगलमूर्ती मोरया।


काळानुसार बनवा आपली वेगळी ओळख
सोशल मीडियाच्या माध्यमातून
आकर्षक बॅनर डिझाइन तसेच व्हिडिओ साठी आजच संपर्क करा

QR स्कॅन करून वेबसाइट ला आजच भेट द्या.

सहिष्णू पंडित
7263859235
फिलोमिना पंडित
9975556073

QR स्कॅन करून यूट्यूब चॅनेल ला आजच भेट द्या.

आमच्या फेसबुक आणि इंस्टाग्रामला फॉलो करायला विसरू नका :

आपली सिंधुनगरी चॅनेल समूहाच्या सर्व वाचक व
प्रेक्षकांच्या अखंड सोबत असण्यानेच शक्य झालेली तीन वर्षे.
आपली साथ अशीच आमच्या सोबत राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

## सर्व गणेश भक्तांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा!



**सुयोग श्रीनिवास पंडित**
(संस्थापक / मुख्य संपादक)





श्री. विजय रावराणे
(मुख्य संचालक)



सौ. फिलोमिना पंडित
(मुख्य संचालक)



प्राध्या. दिनेश किडये
(संचालक)



देवेंद्र गावडे
(उपसंपादक)



वैशाली पंडित
(समूह सल्लागार व समन्वयक)



श्री. सहिष्णू पंडित
(सीइओ|CEO|लीगल ॲडव्हायझर)



सौ. लविना डिसोज़ा
(विशेष प्रतिनिधी)



सौ. नझ़िरा शेख़
(विशेष प्रतिनिधी)



कु. सानिका वायंगणकर
(डेस्क हँडलर)



सौ. दिपाली पुजारे
(कॉर्पोरेट कन्सलटंट)

॥ गणपती बाप्पा मोरया ॥

॥ मंगलमूर्ती मोरया ॥

# गणेश चतुर्थीच्या

## हार्दिक शुभेच्छा!



आपणास व आपल्या परिवारास
**गणेश चतुर्थी** निमित्त मंगलमय शुभेच्छा!
बाप्पाच्या कृपेने आपले जीवन सुख, समृद्धी,
आरोग्य आणि आनंदांने भरून जावो हीच
प्रार्थना!

# ॥ जय अंबे ॥

**- स्वीट मार्ट ॲण्ड फरसाण हाऊस -**

**राईका बंधु**





भरड नाका, मालवण,
जि. सिंधुदुर्ग. ४१६६०६

9423304330